मराठी वाङ्मय मंडळ (२०१९-२०)

दरवर्षीप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये मराठी वाङ्मय मंडळाची स्थापना करण्यात आली. मराठी वाङ्मय मंडळाचे प्रमुख उद्दिष्ट मराठी साहीत्याची व संस्कृतीची जपणूक करणे त्याअनुसार अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

मराठी वाङ्मय मंडळाचे सभासद

१. सौ. स्मिता चावक (अध्यक्ष)
२. सौ. सुप्रिया साळवी (सभासद)
३. सौ. शर्मिला कर्वे (सभासद)
४. सौ. प्रांजल कारखानीस (सभासद)
५. कु. भाग्यश्री लाड (सभासद)
६. कु. नेहा गिन्हे (विद्यार्थी सभासद)
७. कु. हर्षदा नाईक (विद्यार्थी सभासद)

शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये केलेले कार्यक्रम :

१. दिंडी :

आषाढी एकादशीच्या निमित्ताने मराठी वाङ्मय मंडळातर्फे ११ जुलै २०१९ रोजी दिंडीचे आयोजन करण्यात आले. दिंडी कार्यक्रमाच्या आखणीत दोन उद्दिष्टे साध्य केली. एक अध्यात्म भक्ती व तसेच पर्यावरण पुरक संदेश जनमानसात पोहचवणे म्हणूनच पर्यावरण पुरक दिंडी असे म्हणू शकतो.



दिंडीची सुरुवात महाविद्यालयाच्या प्रांगणातून झाली. प्रथम प्राचार्य डॉ. वसंत माळी व सर्व प्राध्यापकांनी पालखीमध्ये मांडलेल्या विठ्ठल तसबीर व ज्ञानेश्वरीचे पुजन केले. नंतर ''ज्ञानोबा माऊली तुकाराम'' ''विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल'' अशा गजरात वाजत गाजत दिंडी मार्गस्थ झाली. महाविद्यालयाच्या जवळील काही मार्ग दिंडीकरीता निवडण्यात आले.



दिंडीमध्ये काही विद्यार्थीनींनी पर्यावरणवरील वेगवेगळया संदेशाचे पोस्टर घेतले होते. ''निसर्गाचे रक्षण करा'' ''झाडे लावा, झाडे वाचवा.'' वगैरे अनेक संदेश देण्यात आले. त्याचबरोबर ११ जुलै हा जागतिक लोकसंख्या दिन असल्यामुळे लोकसंख्या नियंत्रणाचा संदेश सुध्दा पोस्टर मधून देण्यात आला.

दिंडीची सांगता महाविद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आली.

दिंडी विद्यार्थ्यांना एक वेगळाच अनुभव व अध्यात्मिक आनंद देऊन गेली.

२. श्रावणसरी

मराठी वाङ्मय मंडळातर्फे दिनांक २२ ऑगस्ट रोजी श्रावणसरी या पाऊसावरील कविता वाचन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

श्रावणसरी



कार्यक्रमाचे निवेदन कु. श्रेया पवार व कु. जयश्री ढगे या दोन विद्यार्थीनींने केले.

कार्यक्रमाची सुरुवात प्राचार्य डॉ. वसंत माळी यांच्या हस्ते दिप प्रज्वलनाने झाली. त्यावेळी कु. जयश्री ढगे हिने सुंदररित्या सरस्वती स्तवन सादर केले.

श्रावणसरी म्हणजेच श्रावणात बरसणारा पाऊस होय. श्रावणसरी या कार्यक्रमात खरोखरच उपस्थितजन श्रावणातील पावसावरील कवितात चिंब झाले.

खालील कविता या कार्यक्रमात सादर झाल्या.

	कविता	**सादरकर्ते**
१.	गावाकडचा पाऊस	कु. नेहा गिऱ्हे
२.	येरे पावसा	कु. सुषमा ढमढेरे
३.	पाऊस आला	कु. स्नेहा खैरनार
४.	श्रावण आला	कु. पुजा बाबर
५.	अधिर मन झाले	कु. अमिषा झा.
६.	पावसाचा थेंब	कु. सुप्रिया सुराडकर
७.	दाटुण येतील	प्रा. अनघा काटेकर
८.	पावसाचे शब्द	कु. कोमला गौरी

९.	पुन्हा वाटते पाऊस व्हावे	कु. हर्षला नाईक
१०.	मेघा बरसे	कु. विनिता पंडीत
११.	श्रावण सरी	कु. प्रिया यादव
१२.	श्रावण मासी	कु. स्वाती भवसार
१३.	श्रावणसरी श्रावणसरी	कु. शर्मिला कर्वे
१४.	पावसाची कविता	कु. विजया माने
१५.	आला आषाढ श्रावण	कु. वैष्णवी माने
१६.	असा रंगारी श्रावण	कु. मुस्कान शिकलगर
१७.	बे मौसम बारिश	कु. मुस्कान शिकलगर
१८.	पाऊस वेडा	कु. स्मिता चावक
१९.	आपल्या मुंबईचा पाऊस	कु. नेहा गिऱ्हे

कवितांच्या सादरीकरणानंतर प्राचार्य डॉ. वसंत माळी यांनी कार्यक्रमावरील आपले मनोगत व्यक्त करतांना कविता सादर केलेल्या सर्व विद्यार्थीनींची प्रशंसा केली.

९२ विद्यार्थीनी कार्यक्रमाकरीता उपस्थित होत्या.

३. मराठी भाषा संवर्धन पंधरवडा :

मराठी वाङ्मय मंडळातर्फे १ जानेवारी २०२० ते १५ जानेवारी २०२० या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला. या कालावधीत मराठी भाषा व संस्कृती संदर्भातील विविध कार्यक्रमांचे आयोजन केले गेले.



मराठी भाषा संवर्धन पंधरवडयात केलेल्या कार्यक्रमांचे आयोजन

१. २ जानेवारी २०२० रोजी मराठी भाषा संवर्धन पंधरवडयाचे उद्घाटन करण्यात आले.

२. ३ जानेवारी २०२० रोजी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. खालीलप्रमाणे विषय निबंधाकरीता देण्यात आले होते.

अ) मा.श्रीमती सावित्रीबाई फुले—स्त्री शिक्षणाचा पाया

ब) महीला सुरक्षा काळाची गरज

बिगर मराठी विद्यार्थ्यांचा सुध्दा स्पर्धेकरीता प्रतिसाद मिळाला. निबंध स्पर्धेचे विजेते खालीलप्रमाणे —

१) कु. पुजा कश्यप
२) कु.सरीता पवार
३) कु. सोनाली कुमावत

१. ६ जानेवारी रोजी मराठी भाषेतील पुस्तकांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. विद्यार्थ्यांचा खूप चांगला प्रतिसाद प्रदर्शनाकरीता मिळाला.

२. ९ जानेवारी रोजी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. वक्तृत्व स्पर्धेकरीता खालीलप्रमाणे विषय देण्यात आले होते.

अ) आजची शिक्षण पध्दती

ब) स्वच्छ भारत निरोगी भारत

क) मानव व निसर्ग

ड) मोबाईल फायदे / तोटे

१५ विद्यार्थ्यांनी वक्तृत्व स्वर्धेत सहभाग घेतला. प्रत्येक विद्यार्थ्याने विषय अनुरुप मुद्देसुद प्रमाणे आपले म्हणणे मांडले.

वक्तृत्व स्पर्धेचे विजेते खालीलप्रमाणे —

१. कु. दामिनी पाठक — प्रथम क्रमांक
२. कु. नेहा गिऱ्हे — द्वितीय क्रमांक
३. कु. पल्लवी रजपूत — तृतीय क्रमांक



३. ११ जानेवारी रोजी नाटिका स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विविध विषयांवरील नाटिकांचे सादरीकरण केले. या स्पर्धेत पाच नाटिकांचे सादरीकरण झाले. विद्यार्थ्यांनी स्वत:हून लिहीलेले व दिग्दर्शित केलेल्या नाटीका सादर केल्या हया स्पर्धामुळे विद्यार्थ्यांचे नाटकाबद्दलच्या जाणीवा प्रगल्भीत झाल्या. 'मोबाईलचे दुष्परीणाम' या नाटीकेला पारीतोषीक मिळाले.



४. राज्यस्तरीय नवकवीसंमेलन :

१ जानेवारी ते १५ जानेवारी हया मराठी भाषा संवर्धन पंधरवडयाचे औचित्य साधून २१ जानेवारी २०२० रोजी राजयस्तरीय नवकविसंमेलन आयोजित करण्यात आले.



विविध भागातील २२ कवींनी आपल्या कवितांचे सादरीकरण केले. या राज्यस्तरीय नवकवि संमेलनाकरीता डॉ. माधुरी रामधरणे सहाय्यक प्राध्यापिका, पेंढारकर कॉलेज व श्री. संदीप कांबळे, अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद, पुणे परीक्षक म्हणून काम केले.

नवकवीसंमेलनामुळे तरुण विद्यार्थ्यांमधील उत्सफुर्त कवितांचा आस्वाद घेता आला.

स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे लागला.

प्रथम क्रमांक - कु. नम्रता चव्हाण (बिर्ला कॉलेज)

द्वितीय क्रमांक - कु. श्रुती म्हात्रे (एस.एस.टी. कॉलेज)

तृतीय क्रमांक - कु. भावना वाघ (जे. डब्ल्यू साधुबेला कॉलेज)

उत्तेजन बक्षीस- कु.आटोले प्रविण (ए.डी.महाविद्यालय क.अ.जि.बीड)

मराठी भाषा गौरव दिन

जे. वाटुमल साधुबेला महिला महाविद्यालयातर्फे थोर साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस **''मराठी भाषा गौरव दिन''** म्हणून २७ फेब्रुवारी २०२० रोजी साजरा करण्यात आला.



सुप्रसिध्द किर्तनकार, कथाकथनकार, गायिका सौ. मधुरा मराठे या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत पंडीत माळी यांनी भुषविले.

कार्यक्रमाची सुरवात मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन करुन झाली. विद्यार्थीनींनी सुरेल स्वरात सरस्वती वंदना सादर केली. यानंतर प्रमुख पाहुण्यांचे परिचय व स्वागत करुन देण्यात आले.

प्राचार्य डॉ. वसंत पंडीत माळी हयांनी आपल्या भाषणात मराठी भाषेचा नवव्या शतकापासूनचा प्रवास विशद केला. मराठी भाषेत प्रत्येक शतकात होणारा बदल व संत वाङ्मयाने मराठी भाषेची केलेली समृध्दता हया गोष्टी प्राचार्य डॉ. वसंत पंडीत माळी यांनी विस्तृत केल्या.



प्राचार्य डॉ. वसंत पंडीत माळी मराठी भाषेचा प्रवास सादर करतांना.

मराठी वाङ्मय मंडळाच्या अध्यक्षा सौ. स्मिता चावक यांनी आतापर्यंत केलेल्या मराठी भाषा गौरव दिनाबद्दलची माहिती दिली. मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्याची आवश्यकता व उद्देश हयाची माहिती दिली.

त्यानंतर श्री. सुरेश भट लिखित व श्री. कौशल इनामदार यांनी संगीत दिलेल्या मराठी अभिमान गीतांचे व्हिडीओ सादरीकरण केले.

त्यानंतर प्रमुख पाहुण्या सौ. मधुरा मराठे हयांच्या प्रबोधनात्मक कथाकथनाचे सादरीकरण झाले. अतिशय सुंदररित्या सादर झालेल्या कथाकथनातून प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थीनींना दररोजच्या जिवनात आवश्यक असलेल्या गोष्टी म्हणजे वर्तणुक, पेहराव बोलणे, चालणे हयाबद्दल मार्गदर्शन केले.

त्याचवेळेला प्रमुख पाहुण्यांनी मराठी संस्कृतीची महती सांगीतली व 'माय भवानी तुझे लेकरु' हया गाण्याचे सादरीकरण केले. तसेच कुसूमाग्रजांच्या 'कणा' कवितेचा अर्थ विस्तृत केला.

त्यानंतर विद्यार्थीनी कु. नेहा गिऱ्हे व कु. हर्षदा नाईक हयांनी 'हिच आमुची प्रार्थना अन् हेच आमुचे मागणे' ही प्रार्थना सादर केली. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांवरील पोवाडयाचे सादरीकरण केले.

मराठी वाङ्मय मंडळातर्फे १ जानेवारी २०२० ते १५ जानेवारी २०२० हा मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात आला आहे. हया पंधरवडयात वकृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, नाटीका स्पर्धा यांचे आयोजन करण्यात आले होते. हया सर्व स्पर्धांचे बक्षीस वितरण २७ फेब्रुवारी २०२० रोजी करण्यात आले.



स. प्राध्यापिका सौ. शर्मिला कर्वे प्रमुख पाहुण्यांची ओळख करुन देताना.

कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीतांनी झाली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन सहाय्यक प्राध्यापिका कु. भाग्यश्री लाड यांनी केले व आभार प्रदर्शन सहाय्यक प्राध्यापिका कु. अनघा कोटेकर यांनी केले.



विद्यार्थीनी नेहा गिऱ्हे व हर्षदा नाईक सरस्वती वंदना करतांना